# सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

**प्रभाग समिती क्र. १, सांगली**

**जाहीर प्रकटन क्र. ३ / २०२०-२१**

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. १, सांगली विभागामार्फत कोणत्याही शासकीय विभागाकडील **खुले प्रवर्गातील / सुशिक्षित बेरोजगार अभियंता / मजूर सहकारी सोसायटी** नोंदणी प्रमाणपत्र असलेले मक्तेदार यांचेकडून खाली नमूद केलेल्या कामासाठी जाहिर निविदा प्रसिध्द करुन **दोन लिफाफा पध्दतीनुसार** निविदा मागविणेत येत आहेत. सदरच्या निविदा प्रभाग समिती क्र. १, सांगली कार्यालयाच्या बारनिशी विभागामध्ये स्विकारल्या जातील.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रक रक्कम | निविदा फॉर्म फी | कामाची मुदत | वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका मुख्यालयातील पाण्याच्या पाईप लाईन बदलून प्लंबींग कामकाज करणे. | २,९९,३००/- | ३०० | ३० दिवस | वर्ग ९ व त्यावरील |

१) वरील कामासाठी बयाणा रक्कम निविदा रक्कमेच्या १% व सुरक्षा अनामत ५% राहील.

२) संपूर्ण निविदा प्रक्रिया म्हणजेच अर्ज विक्री सादरीकरण व निविदा स्विकृती प्रभाग समिती क्र. १, सांगली द्वारे कार्यरत राहील.

३) निविदा संचाची विक्री प्रभाग समिती क्र. १, सांगली येथे अधिकृत नोंदणी केलेल्या ठेकेदारांना प्रसिध्दीच्या दिनांकापासून फॉर्म फी भरलेची पावती सादर केलेनंतरच कोरे निविदा फॉर्म **दि.०२/०६/२०२० दुपारी १२.००** वाजेपर्यंत देणेत येतील व निविदा प्रभाग समिती क्र. १, सांगली येथे **दि. ०३/०६/२०२०** येथील बारनिशीमध्ये **सायं. ५.००** वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील.

४) प्राप्त निविदा **दि.०४/०६/२०२० रोजी दुपारी ४.००** वाजता निविदा कमिटी समोर उघडणेत येतील.

५) उक्त कामाच्या निविदा, अटी व शर्ती स्वाक्षरी करुन पहिल्या लिफाफ्यासोबत जोडणेच्या आहेत.

६) कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.

७) निविदा प्रक्रियेबाबत अधिक माहितीसाठी महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. १, सांगली येथे संपर्क साधावा.

८) **वरील प्रमाणे खुल्या प्रवर्गासाठी मागविण्यात आलेल्या निविदेमध्ये कोणत्याही शासकीय विभागाकडील नोंदणीकृत सुशिक्षित बेरोजगार अभियंता तसेच मजूर सहकारी सोसायटी मक्तेदार निविदेमधील नमूद मक्तेदार वर्ग व पात्रतेनुसार उक्त निविदेमध्ये सहभाग होऊ शकतात.**

**सही/-**
**(सहदेव काकडे)**
**सहा.आयुक्त**
प्रभाग समिती क्र. १
सांगली मिरज आणि कुपवाड
शहर महानगरपालिका

**जा.क्र.मनपा/प्र.स.क्र.१/सां./ /२०२०-२१**
**सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका**
**दि. / /२०२०**